

# -: श्री. संत एकनाथ महाराज :-

'काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल, नांदतो केवळ पांडुरंग' असे म्हणत ज्यांनी संसारात राहूनही परमार्थ भक्ती केली ती ही अशी की, ज्या योगे श्रीकृष्णालाही त्यांच्या घरी 'श्रीखंड्या' म्हणून राबावे लागावे. असे संतश्रेष्ठ "श्री एकनाथ महाराज".

प्राचीन धर्मपीठ असलेल्या गोदेच्या काठी वसलेल्या पैठण या गावी फाल्गुन वद्य षष्ठी १५३३ मध्ये संत एकनाथांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव 'सूर्यनारायणपंत' व आईचे नाव 'रुक्मिणीबाई'. एकनाथ महाराजांच्या लहानपणी माता व पिता या दोघांचाही मृत्यू झाल्याने नाथांचा सांभाळ हा त्यांचे आजोबा 'चक्रपाणी' यांनी केला. एकनाथांच्या घरात परंपरागत विठ्ठलाची व सूर्याची उपासना होती. त्यामुळेच तेजोमय भक्तीचा संस्कार अगदी बालवयापासूनच त्यांच्यावर होत गेला. यातूनच अगदी वय वर्ष अकरा इतक्या कोवळ्या वयात गुरुच्या शोधार्थ नाथ पैठणहून एकटेच देवगिरीला आले. तेथे त्यांची भेट त्यांचे गुरु 'जनार्दन स्वामी' यांच्याशी झाली. एकनाथांनी जनार्दन स्वामींच्या मार्गदर्शनाखाली तत्वज्ञान, वेद, वेदांत यासारख्या आध्यात्मिकबाबीत तर प्राविण्य मिळवलेच. त्यांच्यासोबतच युद्धकला, कारभार चालवणे या गोष्टीतही ते तरबेज झाले गुरूंच्या अनुग्रहामुळे एकनाथांच्या आत्मिक प्रगतीचा उत्कर्ष झाला; त्यांना प्रत्यक्ष दत्तात्रेयांचेही दर्शन घडले.

गुरूंची आज्ञा घेऊन एकनाथ महाराज पैठणला परतले व गृहस्थाश्रम स्वीकारला. त्यांच्या पत्नीचे नाव 'गिरीजाबाई' होते. 'भगवंताच्या जवळ जाण्याचा मार्ग हा दुष्प्राय नाही; संसारात राहून कर्तव्य पार पाडूनही परमार्थ साधला जाऊ शकतो', हा अतिशय महत्त्वाचा आणि वारकरी तत्त्वज्ञानाचा पायाभूत संदेश संत एकनाथांनी दिला.

ज्ञानेश्वर माउलींनी रचलेल्या ज्ञानेश्वरीचे पुन:संस्करण एकनाथ महाराजांनी केले. परमात्म्याचे खरे स्वरूप लोकांना कळावे, रुचावे यासाठी अभंग, गवळणी, भारुड, वासुदेव, बहुरूपी अशा सामान्य लोकांच्या आवडीचे लिखाण एकनाथांनी मोठ्या प्रमाणात केले. 'परमेश्वराकडे जाण्याचा सर्वात जवळचा मार्ग म्हणजे आपल्या आणि समोरच्या व्यक्तीच्या चैतन्य तत्वाला जाणणे' असे नाथांचे म्हणणे होते म्हणूनच भर उन्हात गोदावरीच्या वाळवंटातून अनवाणी चालणाऱ्या एका लहान हरिजन मुलाला उचलून घेताना, एकनाथांच्या मनात तत्कालीन समाज व्यवस्थेची बंधन आली नाहीत. त्या रडणाऱ्या लहान मुलाला उचलून घेताना त्यांना त्या मुलाला होणारा त्रास, त्याचं रडणं मनुष्यत्व आणि त्याही पलीकडे असणार, त्याच्यात वसणारं चैतन्य दिसलं. एकनाथ महाराजांनी जातिभेद कधीच मानला नाही. त्यांचं कीर्तन, लेखन हे सर्व सामाजिकस्तरांना सामावून घेणारे होते. काळाच्या पुढे असणाऱ्या एकनाथ महाराजांनी सामाजिक समरसतेला अतिशय महत्त्व दिले.

संत एकनाथांनी एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर, शुष्काष्टक टीका, स्वात्मबोध, आनंद लहरी अशी विपुल ग्रंथसंपदा निर्माण केली. फाल्गुन वद्य षष्ठी इ.स. १५९९ रोजी गोदावरी मध्ये संत एकनाथांनी जलसमाधी घेतली.

- वैद्य. ऋचा गणेश रेठरेकर.

व्यक्तिरेखा -

१. विठ्ठल (श्रीखंड्या) - श्री. सुर्यकांत कुलकर्णी.

२. संत एकनाथ - श्री. हृषीकेश गोसावी.

३. बाळाचे आई - वडील - श्री. महेश धोत्रे आणि सौ. शीतल धोत्रे.

४. गावकरी - श्री अमित पाटील.

श्री. भास्करराव काणे.

श्री. उदय काणे.

नेपथ्य -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. सर्वेश उमराणी.
४. श्री. सारंग चव्हाण.

लोकेशन -

क्षेत्र माहुली, सातारा

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित.

२. श्री. गणेश सावंत.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. अद्वैय मुंढे.
२. श्री. शंतनू देशमुख.
३. श्री. महेश पुजारी.
४. श्री. भूषण गरुड.
५. श्री. गिरीश कुलकर्णी.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकार.

चित्र (स्केच) -

१. अद्वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.
- लेखन - वैद्य. ऋचा गणेश रेठरेकर.
- लेख संकलन - श्री. दीपक आफळे
- ध्वनीमुद्रण - सौ. स्वप्नजा बर्वे.
- ध्वनिमुद्रिका -